**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वये प्रसिध्द केलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट (टी.ओ.डी) बाबतचा विनियम लागु करण्याकरिता कलम १५४ अन्वये निदेश...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३,**
**दिनांक :३०/०६/२०२०**

**प्रस्तावना :-** शासनाच्या नगर विकास विभागाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) चे कलम ३१(१) अन्वये, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली (यापुढे "उक्त नियमावली" असे उल्लेखिलेली) अधिसूचना क्र.टिपीएस-१८९०/६९९/प्र.क्र.८९/९०/नवि-१३, दि.१७/१२/१९९०अन्वये मंजूर केली आहे;

शासनाने वाहतूक उन्मुख विकास धोरण [Transit Oriented Development (TOD) Policy] स्विकारले असून, बृहत् जनहिताच्या दृष्टीने, सदर वाहतूक उन्मुख विकास धोरणाची अंमलबजावणी सुलभरितीने होणेसाठी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीसाठी लागु असलेल्या उक्त नियमावलीत टी.ओ.डी. चे विनियम (त्यासोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केल्यानुसार) समाविष्ट करण्यासाठी आणि आवश्यक त्या चौकशीनंतर उक्त विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वये सूचना क्र. टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३, दि.३०/०६/२०२० नुसार प्रसिध्द केली आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रो प्रकल्पाचे काम सुरु झालेले असल्याने ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंन्ट विनियमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सदर विनियम तातडीने लागु करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे. सबब याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI 32

Scanned with CamScanner

**' निदेश '**

" उक्त विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करावयाच्या नवीन विनियम क्र.एन २.६ मधील ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेन्ट बाबतचा विनियम शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वयेची सूचना क्र.टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३, दि.३०/०६/२०२० नुसार प्रसिध्द केला आहे. सदर विनियम तातडीने लागु करण्यात येत आहे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(किशोर गोखले)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति :-

आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे.

प्रत :-

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे,

२) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

३) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.



Scanned with CamScanner